

### गुरुजी कृष्णानंद

हे महर्षी अमरांचे (१९१९ ते १९८२) पट्टशिष्य होत. महर्षी अमरांचा उच्च लोकांतील ऋषींशी संपर्क होता. गुरुजी, महर्षी अमरांना १९७७ साली प्रथम भेटले; त्यांच्या आध्यात्मिक प्रकल्पात १९८२ साली सहभागी झाले आणि १९८८ साली त्यांनी ध्यान शिकवायला सुरुवात केली. सन् १९८८ मध्ये त्यांनी मानसा फाऊंडेशनची स्थापना केली. २००७ साली आध्यात्मिक सत्यांच्या संशोधनासाठी अभ्यास केन्द्र स्थापन केले व २००८ सालात प्रकाश प्रवहनाची जागतिक चळवळ सुरु केली.

सप्त ऋषींच्या मार्गाची त्यांनी स्थापना केली, त्यात प्रशिक्षण देऊन शिक्षकांचा एक ताफा तयार केला, तसेच अनेक पुस्तके लिहिली. त्यांचे “Doorways to Light” हे पुस्तक सुप्रसिद्ध आहे.

### मानसा फाऊंडेशन

मानसा फाऊंडेशनच्या वतीने सप्त ऋषी मार्गातील ध्यान वर्ग तपोनगर व आनेकल येथे तसेच बंगलोर शहरातील विविध केन्द्रांत घेतले जातात. पोस्ट व ईमेलच्या माध्यमातूनही ध्यान शिकविले जाते.

# प्रकाश

## प्रकाशाला एक संधी द्या


मानसा फाऊंडेशन (R)

तपोनगर, चिक्कगुब्बी, (ऑफ हेन्नुर बागलूर रोड),

बंगलोर अर्बन – ५६० ०७७

फोन : (०८०) २८४६ ५२८० , २२७१ ५५०१ , ०९३४२० ३०२५०

( सकाळी १० ते दुपारी ४ )

ई–मेल : info@lightagemasters.com, info@lightchannels.com

वेब साईट : www.lightagemasters.com, www.lightchannels.com

## ह्या प्रकाशाचे स्वरूप काय ?

हा प्रकाश म्हणजे चर्मचक्षूंना दिसणारा प्रकाश नव्हे. हा प्रकाश सर्व दृश्य सृष्टीचे उगमस्थान आहे. तो सर्व सकारात्मक शक्तींचा, प्रेम, शांती, सत्य, विवेक आणि एकूणच संपूर्ण जीवनाचा मूलस्त्रोत आहे. हा प्रकाश साक्षात ईश्वर आहे.

## हा प्रकाश कुठे असतो?

सर्वत्र.

## हा प्रकाश जर सर्वत्र असतो तर त्याला प्रवाहित (चॅनल) करण्याची का आवश्यकता आहे?

कारण हा प्रकाश अतिसूक्ष्म स्तरावर असतो. त्याला आपल्या स्थूल पातळीवर आणण्यासाठी प्रवहन करणे आवश्यक आहे.

## चॅनलिंग ( प्रवहन ) म्हणजे काय ?

चॅनलिंग म्हणजे इच्छा करून प्रकाशाला वरच्या अतिसूक्ष्म पातळीवरुन आपल्या शरीरात प्रवेशू द्यायचे व नंतर त्याला शरीरावाटे आजुबाजूच्या परिसरात पसरवत संपूर्ण जगात पसरू द्यायचे. आपले शरीर ह्या प्रकाशाच्या सूक्ष्म कंपनांचे रूपांतर करून त्यांना स्थूल पातळीशी आणते.

## चॅनलिंगमुळे कशी मदत होते ?

त्यामुळे या प्रकाशाची कंपने सर्व प्राणिमात्र व निसर्गापर्यंत पोचतात. ही कंपने उपचारक शक्ती, प्रेम, शांती व संपूर्ण सकारात्मक शक्ती घेऊन येतात. परिवर्तन घडवून आणण्यात त्यांची मदत होते. त्यामुळे आपण अधिक चांगली माणसे बनू. आपले जग अधिक चांगले जग बनेल.

## प्रकाश चॅनलिंग केल्याने एखाद्याला कशी मदत होते ?

आपल्या विचारांचा, भावनांचा आणि क्रियांचा दर्जा सुधारतो. वादविवादांचे प्रमाण कमी होते. कार्यक्षमता वाढते. आपले जीवन सुधारते.

## चॅनलिंग कोण करू शकतो? त्यासाठी काही पूर्वतयारीची गरज आहे का? तसेच त्यासाठी काही निर्बंध आहेत का?

कोणीही किंवा प्रत्येकच जण प्रकाश प्रवाहित किंवा चॅनल करू शकतो. स्वतःला व जगाला बदलण्याची इच्छा एवढी एक गोष्ट सोडल्यास इतर कोणत्याही पूर्वतयारीची आवश्यकता नाही. प्रकाश प्रवहनासाठी कोणतेही निर्बंध नाहीत.

## लाइट चॅनल्स वर्ल्ड मूव्हमेंट

(प्रकाश प्रवहनाची जागतिक चळवळ)

सप्त ऋषी ध्यान मार्गाचे प्रवर्तक गुरुजी कृष्णानंद यांनी १८-०५-२००८ रोजी सुरू केली.

या चळवळी अंतर्गत आपण पृथ्वीवरील आपल्या राहत्या जागी रोज सकाळी उठल्यावर किंवा रात्री झोपण्यापूर्वी सात मिनिटे प्रकाशाचे प्रवहन करायचे आहे.

या वसुंधरेवर शांतता नांदावी हा या चळवळी मागचा मुख्य उद्देश आहे.

जर सर्वांनी किंवा जास्तीत जास्त लोकांनी प्रकाशाचे प्रवहन केले तर त्याचा परिणाम अधिक मोठ्या प्रमाणावर होईल. जर जास्तीत जास्त लोकांनी एकाच वेळी प्रकाश प्रवाहित केला तर परिणाम अधिक जलद होतो.

## प्रकाश प्रवहन करण्यासाठी तंत्र.

कल्पना करा की तुमच्या वर प्रकाशाचा महासागर आहे. हा प्रकाश खाली अवतरून तुमच्या शरीरात भरतो आहे. आता एक मिनिटासाठी प्रकाशाजवळ असलेल्या प्रेमाचा व शांतीचा अनुभव घ्या. त्यानंतर कल्पना करा की, प्रकाश हळूहळू तुमच्या घरात, गावात, देशात आणि संपूर्ण जगात पसरतो आहे.
या तंत्राचा रोज कमीत कमी सात मिनिटांसाठी सराव करा.

## या चळवळीचे वेगळेपण.

- प्रकाशाच्या माध्यमातून ऐक्य.
- धर्मनिरपेक्ष, वैश्विक स्वरूप.
- कोणतेही निर्बंध नाहीत, कोणत्याही अटी नाहीत.
- सभासदत्वाची गरज नाही.
- जागतिक शांतीसाठी प्रत्येकजण योगदान देऊ शकतो.
- प्रत्येक व्यक्तिला तसेच जगाला मदत मिळते.
- २०१२ साली फोटॉन बेल्ट मध्ये प्रवेश करण्यासाठी आपली व जगाची पूर्वतयारी होते.